# विपश्यना

**साधकांचे मासिक प्रेरणा पत्र**

**बुद्धवर्ष २५५७, श्रावण पौर्णिमा, २१ ऑगस्ट, २०१३ वर्ष २ अंक ६**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

**धम्मवाणी**

**तेसं सम्पन्नसीलानं, अप्पमादविहारिनं।**
**सम्मदञ्ञा विमुत्तानं, मारो मग्गं न विन्दति॥**
*धम्मपद- ५७, पुप्फवग्गो.*

जे शीलसंपन्न आहेत, प्रमादरहित होऊन विहार करतात, यथार्थ ज्ञानाद्वारे मुक्त झालेले आहेत, त्यांच्या मार्गाला मार प्राप्त करू शकत नाही.

## *धर्म-संदेश*

ऑगष्ट महिन्यात छापलेला 'महाभारत' चा लेख माझ्या निजी सचिवाने लिहिला. हा विपश्यना विशोधन विन्यासच्या शोधांनुसार होता म्हणून ह्याला माझ्या नावाने देण्यात त्याला काही दोष दिसला नाही. ही चूक नक्की झाली की हा लेख पत्रिकेत छापण्याच्या लायकीचा नव्हता. **चांगल्या गोष्टींना** चांगल्या रूपात स्वीकार करावे आणि वाईटास वाईटाच्या रूपात पाहून, त्यापासून दूर रहावे. हाच शुद्ध धर्माचा **संदेश आहे.**

ऑगष्टची छापलेली पत्रिका साधकांना पाठविली आहे परंतु लोकांच्या भावनांना ध्यानात घेऊन **इंटरनेट** वरून ह्या लेखाला हटविण्यात आले असून खालील जुना लेख टाकण्यात आला आहे.

सप्रेम साशिष
सत्यनारायण गोयन्का

---

## विश्वशांतीसाठी आंतरिक शांती आवश्यक

*(सहस्राब्दी विश्वशांती शिखर-सम्मेलनात पूज्य गुरुदेव श्री गोयन्काजींचे प्रवचन)*

ऑगष्ट २०००च्या शेवटी पूज्य गुरुदेवांनी वरील शिखर सम्मेलनात भाग घेतला, ज्यात विश्वाचे १००० पेक्षा जास्त धार्मिक आणि आध्यात्मिक नेते यू.एन.ओ. चे प्रधान सचिव श्री कोफी अन्नान यांच्या अध्यक्षते खाली एकत्र झाले होते. ह्या सम्मेलनाचे लक्ष्य सहिष्णुता वाढविणे, विश्वशांतीला प्रोत्साहन देणे आणि विभिन्न सांप्रदायिक नेत्यांद्वारे सौहार्द्रपूर्ण वातावरणात आपसात वार्तालापाला प्रोत्साहन देणे होते. परंतु विभिन्न नेत्यांचे दृष्टिकोन भिन्न असल्यामुळे मतभेद होण्याचीच संभावना प्रबळ होती, अशा वेळी पूज्य गुरुदेवांनी आपल्या प्रस्तुतीकरणात अशा बाबीवर भर दिला की ज्या बाबी सर्व आध्यात्मिक मार्गात समान आहेत. त्या सर्वव्यापी धर्माला म्हणजे निसर्ग नियमांना महत्व दिले पाहिजे. त्यांच्या म्हणण्याचे मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले.

ते म्हणाले, "मित्रांनो, आध्यात्मिक व धार्मिक विश्वाच्या नेत्यांनो! आज आम्ही सर्वांना मिळून मानवतेची सेवा करण्याची एक उत्तम संधी प्राप्त झाली आहे. धर्म एकात्मता आणेल तरच तो धर्म आहे अन्यथा जर तो फूट टाकीत असेल तर तो धर्म नाही.

"आज येथे धर्म परिवर्तनाच्या पक्षात आणि विपक्षात खूप चर्चा झाली. मी परिवर्तनाच्या विरोधात नाही, तर त्याच्या पक्षात आहे– परंतु परिवर्तन एका संप्रदायापासून दुसऱ्या संप्रदायात नाही, तर परिवर्तन दुःखातून सुखात, बंधनातून मुक्तीत, क्रूरतेतून करुणेकडे झाले पाहिजे. आज अशाच परिवर्तनाची आवश्यकता आहे आणि ह्यासाठीच ह्या सम्मेलनात प्रयास करावयाचा आहे.

"पुरातन भारताने विश्वाच्या समग्र मानवतेला शांती आणि सामंजस्याचा संदेश दिला. परंतु केवळ इतकेच नाही, तर शांती-सामंजस्य प्राप्त करण्याची रीत दिली, विधीही दिला. मला असे वाटते की मानव समाजात जर खरोखर शांती स्थापित करावयाची आहे तर आम्हाला प्रत्येक व्यक्तीला महत्व द्यावे लागेल. जर प्रत्येक व्यक्तीच्या मनात शांती नसेल, तर विश्वात वास्तविक शांती कशी येईल? जर माझे मन व्याकुळ आहे. नेहमी क्रोध, वैर, दुर्भावना आणि द्वेषाने भरलेले राहते, तर मी विश्वाला शांती कशी प्रदान करू शकतो? असे करूच शकत नाही कारण माझ्यातच शांती नाही. म्हणून संतांनी आणि प्रबुद्धांनी म्हटले, "शांती आपल्या आत शोधा." स्वतः आपल्या आत निरीक्षण करून पाहावयाचे आहे की काय खरोखर माझ्यात शांती आहे. विश्वाच्या सर्व संतांनी सत्पुरुषांनी आणि मुनिंनी हा सल्ला दिला की –"आपल्या स्वतःला जाणा" म्हणजे केवळ बुद्धीच्या स्तरावर नाही. भावावेशात येऊन अथवा श्रध्देमुळे स्वीकारू नका, तर जेव्हा आपल्या अनुभूतीने आपल्याबाबत सत्याला जाणाल, तेव्हा जीवनाच्या समस्यांचे आपोआप समाधान होत जाईल.

"असे झाल्यावर व्यक्ती सर्वव्यापी नियमांना, निसर्गाच्या नियमांना अथवा असे म्हणू की ईश्वराच्या नियमांना समजू लागते. हा नियम सर्वांवर लागू होतो. जेव्हा मी क्रोध, वैर दुर्भावना, द्वेष निर्माण करतो तेव्हा त्याचा सर्व प्रथम शिकार मीच होतो. मी प्रथम आपली हानी करतो आणि नंतरच इतरांची हानी करतो. हा निसर्गाचा नियम आहे. जर मी आपल्या आत निरीक्षण करीन तर पाहीन की जेव्हाही मनात काही वाईट भावना जागते, शरीरात त्याची प्रतिक्रिया जाणवते. शरीर गरम होते, जळू लागते,

हृदयाची धडधड वाढते. तणाव जाणवू लागतो. मी व्याकूळ होतो. आत वाईट भावना जागवून जेव्हा मी व्याकूळ होतो तेव्हा आपली व्याकूळता केवळ आपल्यापर्यंतच सीमित ठेवत नाही, तिला इतरांनाही वाटतो. आपल्या आस-पासच्या वातावरणाला इतके तणावपूर्ण बनवतो की जो माझ्या संपर्कात येतो तो व्याकूळ होतो. मी जरी कितीही सुख शांतीच्या गोष्टी केल्यातरी, माझ्या आत काय होत आहे, हे शब्दांपेक्षाही अधिक महत्वपूर्ण आहे. जर माझे मन निर्मळ आहे तर निसर्गाचा दुसरा नियम आपले काम करू लागतो. जसे ही माझे मन निर्मळ झाले की हा निसर्गाचा ईश्वर मला पुरस्कार देऊ लागतो. मला शांतीचा अनुभव होतो. ह्याला मी आपल्या आत स्वतः पाहू शकतो.

"कोणी कुठल्याही संप्रदायाचा, परंपरेचा, देशाचा असो, जेव्हा तो निसर्गांच्या नियमांना तोडून मनात दुर्भावना जागवितो तर दुःखी होतो. निसर्ग स्वतः दंड देतो. निसर्ग नियमांना तोडणारा तत्काळ नारकीय यातनेचा अनुभव करतो. ह्या वेळी नारकीय दुःखाचे बीज पेरत असाल तर मृत्युनंतरही नारकीय दुःखच मिळेल. तसेच, जर मी आपल्या मनाला शुद्ध ठेवून, मैत्री आणि करुणेने भरतो तर आताही आपल्या आत स्वर्ग सुख भोगतो आणि हे बीज मत्युनंतरही स्वर्गीय सुखच आणेल. मी आपल्या स्वतःला हिंदू म्हणू अथवा मुस्लिम, ख्रिश्चन, जैन काहीही म्हणू. काहीही फरक पडत नाही. मनुष्य मनुष्य आहे आणि मनुष्याचे मानस मनुष्याचे मानस आहे.

"त्यामुळे परिवर्तन झालेच पाहिजे मनाच्या अशुद्धतेचे मनाच्या शुद्धतेत. हे परिवर्तन लोकात आश्चर्यजनक बदल घडवेल. हा काही जादूचा चमत्कार नाही, तर आपल्या आत शरीर आणि चित्ताच्या पारस्परिक संस्पर्शाचा प्रभाव आहे जे एक विशुद्ध विज्ञान आहे. कोणीही समजू शकतो की मन कशा प्रकारे शरीराला प्रभावित करते आणि शरीर कशा प्रकारे मनाला प्रभावित करते. मोठ्या धैर्याने जेव्हा ह्याचे निरीक्षण करीत जावे तेव्हा निसर्गाचा नियम खूप स्पष्ट होत जातो की जेव्हाही आम्ही चित्तात विकार जागवतो, दुःखी होतो आणि जसे चित्त शुद्ध होते, तसेच शांती-सांमजस्याचे सुख भोगू लागतो. आत्म निरीक्षणच्या ह्या विद्येचा अभ्यास कोणीही करू शकतो.

"प्राचीन काळात भगवान बुध्दांद्वारे शिकविली गेलेली ही विद्या विश्व भरात पसरली. आजही विभिन्न वर्गांचे, परंपरांचे, संप्रदायाचे लोक येऊन ह्या विद्येला शिकतात आणि तोच लाभ प्राप्त करतात. ते स्वतःला हिन्दू, बौध्द, मुसलमान, ख्रिश्चन म्हणवत राहोत, ह्या नावांनी काहीही फरक पडत नाही. मनुष्य मनुष्य आहे फरक ह्या बाबीनी होईल की ते अभ्यासाने वास्तविक धार्मिक बनोत, मैत्री आणि करुणेने परिपूर्ण होत जावोत. त्यांचे कर्म स्वतः आपल्यासाठीही आणि अन्य सर्वांसाठी चांगले होवो. जेव्हा कोणी व्यक्ती मनात शांती जागविते तेव्हा तिच्या आस-पासचे सारे वातावरण शांतीच्या तरंगांनी भरून जाते आणि जो कोणी त्याच्या संपर्कात येतो तो शांती अनुभव करतो. हे मानसिक परिवर्तन वास्तविक परिवर्तन आहे, आवश्यकता ह्याच बाबीची आहे. अन्यथा सर्व बाह्य परिवर्तन निरर्थक आहेत.

"मी विश्वाला भारताचा एक कल्याणकारी संदेश वाचून दाखविण्याची अनुमती मागतो. २३०० वर्षापूर्वी दगडावर खोदलेले एक आदर्श शासक सम्राट अशोकाचे हे शब्द सांगतात की शासन कसे करावे. तो म्हणतो "आम्ही केवळ आपल्या धर्माला (संप्रदायाला) सन्मान देऊन, दुसऱ्या संप्रदायांची निंदा करू नये." आज ह्या संदेशाचे खूप मोठे महत्व आहे. दुसऱ्या संप्रदायाची निंदा करून आपल्याच संप्रदायाला सर्वोत्तम सिद्ध करीत व्यक्ती मानवतेसाठी अडचणी निर्माण करते. ह्यानंतर म्हणतो "ह्या ऐवजी नाना कारणांनी दुसऱ्या संप्रदायांचा सन्मान केला पाहिजे. सालपट नेहमी भिन्न असतात; वेगवेगळे रीतीरिवाज, कर्मकांड, अनुष्ठान आणि धारणा असतील. त्या सर्वांना घेऊन भांडण करण्यापेक्षा त्यांच्या आतील साराला महत्व दिले पाहिजे. अशोकाच्या अनुसार; "असे करून आम्ही आपल्या धर्माला वाढवितो व इतरांच्या धर्माची सेवा करतो. ह्या विपरीत व्यवहाराने आम्ही आपल्या संप्रदायाचीही हानी करतो आणि दुसऱ्यांच्याही......"

"हा संदेश आम्हा सर्वांना एक गंभीर चेतावनी देतो की जी कोणी व्यक्ती आपल्या संप्रदायाप्रती अती श्रद्धेमुळे दुसऱ्या संप्रदायांची निंदा करीत हा विचार करते की असे केल्यामुळे मी आपल्या संप्रदायाची शान वाढवितो, ती आपल्याच कृत्यामुळे आपल्याच संप्रदायाची अधिक हानी करते.

शेवटी अशोक सर्वव्यापी नियमांचा, धर्माचा संदेश प्रस्तुत करतो, "मैत्रीच चांगली आहे, आपसातील भांडण नाही. इतरांव्दारे घोषित सिद्धांत (शिकवण) ऐकण्यासाठी सर्वांनी तयार राहावे." अस्वीकार करणे व निंदा करण्याऐवजी, आम्ही प्रत्येक संप्रदाया (धर्मा)च्या सारास महत्व द्यावे, तेव्हाच समाजात वास्तविक शांती आणि सामंजस्य स्थापित होईल."

सर्वांचे मंगल होवो.

## *मंगल मृत्यु*

जयपूरचे विपश्यना- आचार्य श्री एस. अडवियप्पा ९० वर्षाच्या पक्व वयात गेल्या ८आगस्ट,२०१३ ला मृत झाले. ते राजस्थान सरकारच्या लोकनिर्माण विभागात मुख्य अभियंता (इंजिनीयर) व सचिव होते. ह्यातून निवृत्त होऊन ते 'ब्रिज कारपोरेशन ऑफ राजस्थान' चे अध्यक्ष निवडले गेले. सेवाकाळातच त्यांनी विपश्यनेचे पहिले शिबिर केले. आणि तेव्हापासून हिचेच होऊन राहिले. सरकारी सेवेतून निवृत्त होऊन सर्व जीवन विपश्यनेला समर्पित केले. १९८७ मध्ये ते विपश्यनेचे सहायक आचार्य नियुक्त झाले आणि १९९७ मध्ये पूर्ण आचार्य. आपल्या अनुभवांच्या बळावर त्यांनी दक्षिण भारत (कर्नाटक, केरळ, तामीळनाडू व आंध्र प्रदेशा) च्या जवळपास सर्व केंद्रांच्या निर्माणकार्यात सहयोग दिला आणि त्या क्षेत्रात विपश्यनेच्या कार्याला गती प्रदान केली. मुंबईच्या **ग्लोबल विपश्यना पगोडाचे** निर्माणकार्य आरंभ झाले तेव्हा पूर्णकालिक सेवकांच्या रूपाने पगोडा परीसरात राहून पगोडा -निर्माणसोबतच धम्मपत्तनचीही खूप सेवा केली. वय वाढल्यानंतर आणि स्वास्थ कमजोरीमुळे मागील काही वर्षापासून आपल्या परिवारासोबत जयपुरात राहू लागले होते. त्यांच्या परिवाराचे सर्व सदस्य विपश्यी आहेत. अंतीम क्षणी त्यांनी खूप शांतपणे शरीर त्यागले. त्यांच्या पुण्यकर्मांच्या फळस्वरूप त्यांना शांतिलाभ प्राप्त होवो.

---

ऑस्ट्रेलियाची केय (उल्फ) जॉन्सटन भारताच्या प्रारंभिक शिबिरात (७०च्या दशकात) भाग घेऊन खूप प्रसन्न झाली आणि त्यानंतर आपल्या देशात शिबिर लावण्यात आणि त्यात सेवा देण्याचे काम करीत राहिली. तेथे केंद्रांची स्थापना झाल्यावर अजूनच सक्रिय

झाली. मि. किम जॉन्स्टनसोबत वैवाहिक संबंध स्थापित करून दोन्ही गृही जीवनासोबत विपश्यनेच्या कामातही सामील होते.दोन्ही १९९२ मध्ये सहायक आचार्य आणि १९९८ मध्ये वरिष्ठ सहायक आचार्य नियुक्त झाले आणि अनेकांची सेवा केली. परंतु दुर्भाग्याने कॅन्सरग्रस्त झाल्यामुळे केय पुन्हा कोणतेही शिबिर संचालन करू शकली नाही. तिची व पुत्र डैनियलची देखभाल करण्यासाठी किमला आपला गृहस्थधर्म निभावण्यासाठी सहायक आचार्याच्या सेवेतून मुक्त व्हावे लागले. २५ जूनच्या सकाळी ११-३० वाजता केयने धर्ममय वातावरणात खूप कष्टांना समतेने सहन करीत, विपश्यनेचे एक अनोखे उदाहरण प्रस्तुत करीत खूप शांतिपूर्वक शरीर त्याग केला. तिचे पुण्य कामास आले. मृतास शांतिलाभ प्राप्त हो.

------------

बडोदाच्या श्रीमती संतोकबेन वसनजी गाला १९९७ पासून सहायक आचार्या होत्या. पति-पत्नी दोघेही धम्मसिंधू, बाडाच्या २० दिवसीय शिबिरात सामील होते. २७ मार्च, २०१३ ला शिबिर आरंभ होण्याच्या दिवशी त्या बिल्कुल ठीक होत्या. आरामात शिबिर आरंभ केले. हॉलमधे बसून त्रिशरण आणि आनापान घेतले. सत्र पूर्ण झाल्यावर निवासाकडे जातांना खोलीत पोहचण्यापूर्वीच मोठा हार्ट अटैक आला. तिथेच पडल्या व मोकळ्या आकाशाखाली त्यांचे शरीर शांत झाले. चेहऱ्यावर न पीडेचे भाव, न भितीचे, ओरडल्याही नाही. वाटले जसे आरामात झोपल्या असाव्यात. पतीला सूचना देण्यात आली. तेही शांत राहिले आणि शव घेऊन घरी आले. श्रीमती संतोकबेनने खूप शिबिरात सेवा दिली होती. ज्याने ऐकले त्याला वाटले असा मृत्यू सर्वांना यावा. निश्चितच तिचे मंगल झाले.

---------

## पालितानात नव्या केंद्राचे निर्माण व एक-दिवसीय शिबिर

प्राचीन आध्यात्मिक नगर पालितानापासून ९ किमी. दूर सोनागढ रोडवर नव्या विपश्यना केंद्राचे निर्माण होत आहे. पूज्य गुरूदेवांनी याला “धम्म पालि” नावाने विभूषित केले आहे. येत्या २० ऑक्टोंबर, रविवारी ह्या भूमिवर प्रथम एक-दिवसीय शिबिर जुन्या साधकांसाठी लावण्यात येत आहे. सर्व साधक-साधिका ह्याचा लाभ घेऊ शकतात. जे ह्याच्या निर्माणात भागीदार बनू इच्छित असतील ते खालील व्यक्तिशी फोनद्वारे संपर्क करू शकतात—

१. श्री अनिल शाह, ९४२७२-३२१४५, भावनगर; २. श्री राजू मेहता, ९४२६२-३०३३१, राजकोट; ३. श्री नीतेश कोठारी, ९८२१८-२०८९२, मुंबई.

बैंक : **भावनगर विपश्यना सेंटर,** कोटक महेंद्र बैंक, अकाउंट नं. 6411183455, शाखा– वाघवाडी IFS CODE: KKBK0000891 (used for RTGS & NEFT transactions)

---------

## धम्मपुष्कर, विपश्यना केंद्रावर पगोडाचे निर्माण

अजमेरजवळ पहाडाच्या तळाजवळ बनलेल्या सुंदर “धम्म पुष्कर” विपश्यना केंद्रात मागील चार वर्षापासून विपश्यनेचे शिबिर संचालित केले जात आहेत. साधनेयोग्य चांगल्या सोयी आणि चांगले वातावरण बनले आहे. साधनेचा पूर्ण लाभ घेण्यासाठी येथे २९ शून्यागार असणाऱ्या एका पगोडाचे निर्माणकार्य आरंभ झाले आहे. कामाचा वेग कमी आहे. ह्याला गती प्रदान करण्यास इच्छुक साधक-साधिका पुढे येऊ शकतात. ह्याला ८० जी ची सुविधा प्राप्त आहे. साधकांना आपली दान-पारमी पुष्ट करण्याची सुसंधी आहे. आधिक माहितीसाठी संपर्क करा-

१. श्री रवि तोषणीवाल, मो.-९८२९०-७१७७८, २. श्री अनिल धारीवाल, मो. ९८२९०२८२७५. खालील बॅंकेत सरळ पैसे जमा केल्यावर अवश्य सूचित करावे. Name: **Vipassana Kendra Pushkar,** Bank : **Indian Bank,** Jaipur Road, Ajmer, Account No : 517444214,
IFS Code : IDIB000A006, MICR Code : 305019001

---------

## धम्म कानन विपश्यना केंद्रावर पगोडाचे निर्माण

बालाघाटच्या धम्म काननमध्ये मागील अनेक वर्षापासून शिबिर नियमित रूपाने आयोजित केले जाते. साधकांना पूर्ण लाभ मिळत आहे. आयोजकांनी ७५ शून्यागार असणाऱ्या पगोडाचे निर्माणकार्य आरंभ केले आहे. साधकांना आपली दान-पारमी पुष्ट करण्याची योग्य सुसंधी आहे. जे कोणी साधक–– साधिका ह्यात भाग घेऊ इच्छित असतील ते खालील खात्यात सरळ पैसे पाठवून आपले विवरण फोनद्वारे सुचित करू शकतात.–

**धम्मारण्य विपश्यना ट्रस्ट,** भारतीय स्टेट बैंक, बालाघाट

अकाउंट नं. 10750422377, (IFS code-SBIN0000318). Tel. (07632). 248145, Mob. 97531-44641, 94254-47996,

---------

## गोंदियात नवे विपश्यना केंद्र-धम्म गोंड

गोंदिया (महाराष्ट्र) शहरापासून ९ किमी.दूर ओझाटोला गावात नव्या विपश्यना केंद्राचे निर्माणकार्य आरंभ झाले आहे. ह्याला पूज्य गुरूदेवांनी **“धम्म गोंड”** नावाने विभूषित केले आहे हे खर्रा पहाडाजवळ निसर्गरम्य सुंदर रमणीय स्थान आहे. अधिक माहिती व पुण्यार्जनासाठी संपर्क करा– धम्मिको चैरिटेबल ट्रस्ट, गोंदिया, द्वारा– जे. ए. वालदेव मैत्रीय भवन, सुगत चौक, बुद्धविहाराजवळ श्रीनगर, गोंदिया-441601. ईमेल- vipassanagondia@gmail.com;
Bank: **Central Bank of India**, branch- Gondia,
A/c. 3045883855. (IFS code-CBIN0280687)

---------

## ग्लोबल विपश्यना पगोडासाठी कॉर्पस फंड

ग्लोबल पगोडाच्या निर्बाध संचालनासाठी एक कॉर्पस फंड एकत्र केला जात आहे, ज्यामुळे भविष्यात ह्याचा सांभाळ कोणत्याही बाहेरील दबावाविना सफलतापूर्वक होत राहील आणि म्यंमामध्ये सद्धर्माला सुरक्षित ठेवणे तसेच भारतात परत पाठविणे याबद्दल सयाजी ऊ बा खिन व म्यंमाच्या प्रती कृतज्ञता ज्ञापनाचे हे अद्भुत पावन प्रतीक हजारो वर्षापर्यंत कायम राहील. ह्या कॉर्पस फंडाचा उपयोग कोणतीही व्यक्ती आपल्या व्यक्तिगत लाभासाठी करू शकत नाही, तर सरकारी बँकेत जमा ह्या धनाच्या व्याजाने पगोडाचा दैनिक खर्च व सांभाळासंबंधी कामे पगोडा-संरक्षणाच्या नियमानुसार होत राहतील.

**कार्पस फंड दान पाठविण्यासाठी विवरण ह्या प्रकारे आहे –**

१. भारतात कोर बँकिंगव्दारे ग्लोबल विपश्यना फाउंडेशनला दान पाठविण्यासाठी भारताच्या कोणत्याही बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून पैसे पाठवू शकतात. विवरण खालील प्रमाणे आहे–

**"Global Vipassana Foundation"**
**'Axis Bank India'**, A/C. NO: 911010032397802
SWIFT CODE: AXISINBB062,
IFSC CODE: UTIB0000062
MICR CODE: 400211011,
BRANCH: Malad west branch, Mumbai-400064.

२. भारताच्या बाहेरून दान पाठविण्यांसाठी विवरण खालील प्रमाणे आहे– **( SWIFT transfer to 'Bank of India')**
**SWIFT Transfer details are as follows:**
**"Global Vipassana Foundation"**
Name of the Bank : **"J P Morgan Chase Bank"**
Address : New York, US,

A/c. No. : 0011407376, Swift: CHASUS33. ➔ ➔

**चेक/ड्राफ्ट कृपया खालील पत्यावर पाठवावेः**

**ग्लोबल विपश्यना फाउंडेशन** रजि. ऑफिस-- ग्रीन हाऊस, २रा माला, ग्रीन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- 400023. *फोन*- **022-22665926**.

------------

## विपश्यना विशोधन विन्यासला मुंबई विश्वविद्यालयाची मान्यता

मुंबई विश्वविद्यालयाद्वारे विपश्यना विशोधन विन्यासला पालीत एम. ए. व पीएच. डी. छात्रांना मार्गदर्शन करण्याचे केंद्र म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. शोधद्वारे पालीत एम. ए. व पीएच. डी करण्यासाठी योग्य छात्र **विपश्यना विशोधन विन्यास** (वि. आर. आय.) ग्लोबल विपश्यना पगोडा, मुंबई येथे आवेदन करू शकतात. ह्यासाठी संपर्क करा. **ईमेलः <s_sanghvi@hotmail.com>**

------------

### शरद पौर्णिमेनिमित्त पूज्य गुरूदेव व माताजींच्या सानिध्यात एक दिवसीय महाशिबिर

**२० आक्टोंबर,** २०१३, **रविवार, वेळः** सकाळी **११** वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पगोडा'** च्या मोठ्या धम्मकक्षात (डोम). **३ वाजता पूज्य गुरुजींच्या प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात. शिबिरासाठी मोठ्या संख्येने धर्मसेवकांचीही आवश्यकता आहे.** कृपया खालील फोन नंबरांवर अथवा ईमेलने त्वरित संपर्क करावा. **कृपया बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्क :** मो. 09892855692, 09892855945, फोन नं.: 022-28451170,33747543,33747544, (**फोन बुकिंगः** सकाळी **११** ते सायं. **५** वाजेपर्यंत, रोज)

**ईमेल Regn: oneday@globalpagoda.org**
**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

### अतिरिक्त उत्तरदायित्व

**आचार्य**

1. Mr. D. H. Henry, Sri Lanka, To serve as Centre Teacher for Dhamma Sobha, Kosgama

**सहायक आचार्य**

1. Mr. Vitharanage Karunasena, Sri Lanka, To assist Centre Teacher in serving Dhamma Sobha, Kosgama

**वरिष्ठ सहायक आचार्य**

1. Ms. Andrea Gerber, Germany

**नव नियुक्ती सहायक आचार्य**

१-२. श्री बी. एस. अचुथा व श्रीमती सरस्वती नाइक, भोपाल
३. श्री ओंकार वाकोडे, उल्हासनगर
४. श्रीमती विजया पवार, धुले
५. श्रीमती दीपा नारखेडे, जलगांव
६. कु. सुरेखा अड्डिगा, हैदराबाद
७. श्री यलामनचली पांडुरंगा राव, हैदराबाद
८. श्री एस. कृष्णा रेड्डी, हैदराबाद
९. श्री नरेश कुमार शर्मा, रोहतक
10. Ms. Motoko Sakai, Japan
11. Mr. Himanshu Mehta, USA
12. Mr. Richard McCabe, USA
13-14. Mr. Po-Hsiu Chang & Mrs. Tung-Mei Tsai,Taiwan
15. Mr. Gustavo Them, Spain
16. Mrs. Naron Ear, Australia
17-18. Mr. Jamie and Mrs. Tamara Edwards, Australia
19. Mr. Fabio Schinazi, Belgium

### बालशिविर शिक्षक

१. श्रीमती कुँवरबेन अंबालाल गामी, कच्छ
२. श्रीमती कुसुम किशोर पटेल, कच्छ
३. श्री अमित उपाध्याय, दिल्ली
४. कु. ऊषा राममूर्ति, दिल्ली
५. श्रीमती किरन अमीन, जबलपुर
६. डॉ. गुलशनराय माकन, जबलपुर
७. कु. पुष्पा तामंग, सिक्किम
८. कु. पासंग डोमा वांगडी, दार्जीलिंग
9. Mr.Pornpoj Roger Sansuchat, Bangkok
10. Mrs Eva Dyson, Hong Kong
11. Mrs. Ikewati Soewarno, Indonesia
12. Ms. Vyvian Kau Mooi-Ping, Malaysia
13. Ms. Choo Fing-Yee, Malaysia
14. Mr Jaques Sibert, France
15. Mr. Jason Woodbury, USA
16-15. Mr Nyan Win and Mrs Nyo Nyo Aung Kyaw, USA
17. Ms. Farah Aisha Snipes, USA
18. Ms. Samantha Leigh Wechsler, USA
19. Mrs. Meenu Gupta, USA
20. Ms. Danielle Mulack, USA
21. Mrs Melissa Stiers Kretzchmer, USA
22. Mr Ryan Shelton, USA
23. Mr. John Miles, USA

### दोहे धर्माचे

**हिंसा चोरी मद्य रतच, हो रत व्यभिचारी।**
**हे कायेचे मळ असे, काय शील सुधारी॥**

**बोल खोटे कटू वचन, चुगली वा बकवास।**
**वाणीला मलिन करते, हो शीलांचा नाश॥**

**पर-पीडन दुःशील हो, विरत राहणे शील।**
**पर-पीडक दुःखी असे, सज्जन सुखी सुशील॥**

**दुर्लभ जीवन मनुजचे, अती भाग्य पावे।**
**प्रज्ञा शील समाधीविन, वृथा त्यास गमावे॥**

**पंचशील पालन भले, सम्यक हो समाधी।**
**प्रज्ञा तर जागृतच भली, दूर हो भव व्याधी॥**

### दोहे धर्माचे

**या लोकांनो विश्वाच्या, धारू धर्म महान।**
**शील समाधी पुष्ट करू, होऊच प्रज्ञावान॥**

**शील धर्माचे अंगणच, ध्यान धर्माची भिंत।**
**प्रज्ञा हेच छत धर्माचे, मंगल भवन पुनीत॥**

**शील धर्म पालन करी, न कर वाईट काम।**
**मान खाली झुकू नये, होऊ नये बदनाम॥**

**शुद्ध धर्म पुन्हा जागो, प्रज्ञा शील समाधी।**
**जन मनाचे दुःख मिटो, मिटो रोग उपाधी॥**

**धर्म पथास जातांना, प्रथम पाऊल दान।**
**दुसरे तीसरे चवथे, शील समाधी ज्ञान॥**


**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरि, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
**Email:** info@giri.dhamma.org
**Website:** www.vridhamma.org